आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२१ ऑगस्ट २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- भाजपाचे धैर्यशील पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नितीन पाटील यांची राज्यसभेवर निवड निश्चित
- बदलापूरच्या लैंगिक अत्याचार प्रकरणाचा राज्यात विविध ठिकाणी निषेध, शनिवारी महाराष्ट्र बंदची काँग्रेसची हाक / बदलापुरात परिस्थिती सुरळीत, मात्र अफवा रोखण्यासाठी काही दिवस इंटरनेट सेवा बंद राहणार
- राज्यशासनाच्या कृषी महोत्सवाचं केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या हस्ते परळी वैजनाथमधे उद्घाटन

**आणि**

- पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेतला कांस्यपदक विजेता नेमबाज स्वप्नील कुसळे याचं कोल्हापुरात जल्लोषात स्वागत

**<><><><><>**

भाजपाचे राज्यसभेसाठीचे उमेदवार धैर्यशील पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नितीन पाटील यांचा बिनविरोध विजय निश्चित झाला आहे. देशभरात राज्यसभेच्या १२ जागांसाठी पोटनिवडणूक होत आहे. महाराष्ट्रातून खासदार पियुष गोयल आणि उदयनराजे भोसले लोकसभेवर निवडून गेल्यामुळे रिक्त झालेल्या दोन जागांवर पोटनिवडणूक होणार होती. यांच्या बिनविरोध निवडीमुळे केवळ औपचारिकता बाकी आहे. उदयनराजे भोसले यांच्या जागी राष्ट्रवादी काँग्रेसनं नितीन पाटील यांची उमेदवारी आजच घोषित केली, तर भाजपानं काल रायगडचे माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या नावाची घोषणा केली. या दोघांनीही आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस होता.

**<><><><><>**

बदलापूरमध्ये लहान मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ महाविकास आघाडीनं येत्या शनिवारी ‘महाराष्ट्र बंद’ पुकारला असल्याचं  काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज सांगितलं. महाविकास आघाडीच्या बैठकीनंतर  मुंबईत ते वार्ताहरांशी बोलत होते.

राज्यात लहान मुलं, महिलांवरच्या अत्याचाराच्या प्रकरणात अनेक पटींनी वाढ झाली आहे. त्यामुळं हा बंद पुकारल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले.

याच मुद्द्यावर काँग्रेसनं आज मंत्रालयासमोर आंदोलन केलं. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, खासदार वर्षा गायकवाड, आमदार अस्लम शेख यांच्यासह अनेक नेते यावेळी उपस्थित होते. राज्य सरकार कायदा सुव्यवस्था राखण्यात अपयशी ठरल्यानं सरकारनं राजीनामा द्यावा, अशी मागणी वड़ेट्टीवार यांनी केली.  याप्रकरणी नियुक्त झालेले विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम हे भाजपाचे आहेत या कारणावरुन त्यांची नियुक्ती रद्द करण्याची मागणी वर्षा गायकवाड यांनी केली.

**<><><><><>**

या अत्याचाराच्या घटनेचे पडसाद आज राज्यात विविध ठिकाणी उमटत आहेत. राज्यात ठिकठिकाणी निदर्शन, आंदोलन केली जात आहेत.

बदलापूर घटनेच्या निषेधार्थ आणि राज्य सरकारच्या विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं **सोलापूर** जिल्हा परिषद पूनम गेट इथं आज निदर्शनं केली. राज्यपालांनी राज्य सरकार बरखास्त करावं, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी राजीनामे द्यावेत अशी मागणी पक्षानं केली.  ज्या शिक्षण संस्थेत ही घटना झाली तिच्या पदाधिकाऱ्यांवर, या प्रकरणातल्या आरोपीवर, आणि त्याच्याविरोधात कारवाई करायला हलगर्जी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

**भंडाऱ्यात**ही बदलापूर इथल्या घटनेच्या निषेधार्थ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं त्रिमूर्ती चौकात आंदोलन केलं.

**पुण्यात**ही गुडलक जंक्शन इथं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं या घटनेच्या निषेधार्थ आंदोलन केलं.

**<><><><><>**

बदलापूर इथं दोन लहान मुलींच्या लैंगिक शोषण प्रकरणी काल झालेल्या आंदोलनानंतर या भागातली परिस्थिती आणि रेल्वे वाहतूक सुरळीत असून अफवा पसरू नयेत, यासाठी काही दिवस इंटरनेट सेवा बंद ठेवण्यात येणार आहे. बदलापूर आणि परिसरातल्या शाळा आज बंद आहेत.  रेल रोको आंदोलन करणाऱ्या ३०० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. २८ जणांना पोलिसांनी अटक केली असून त्यापैकी २२ जणांना न्यायालयानं १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत पाठवलं आहे. या पार्श्वभूमीवर बदलापूर रेल्वे स्थानक परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे याची पोलीस कोठडी न्यायालयानं आज २६ ऑगस्टपर्यंत वाढवली.

**<><><><><>**

रत्नागिरी विमानतळाच्या नवीन प्रवासी टर्मिनल इमारतीचं भूमिपूजन आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालं. रत्नागिरी जिल्हा पर्यटनासाठीचं केंद्र व्हावा यासाठी हे विमानतळ महत्त्वाचं ठरेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री शिंद यांनी या वेळी केलं. परदेशी नागरिकांसाठीही हा मार्ग अतिशय महत्त्वाचा आहे. हे लक्षात घेऊन १०० कोटी रुपयांच्या या टर्मिनलचं भूमिपूजन आज संपन्न झाल्याची माहितीही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिली.

राज्यातल्या सर्व विमानतळांमध्ये धावपट्टी परिपूर्ण असली पाहिजे, नाइट लँडिंग सुविधा सगळीकडे असली पाहिजे, यावर भर द्यावा. अशा सूचना

मुख्यमंत्र्यांनी या वेळी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या उपाध्यक्ष स्वाती पांडे यांना केल्या. त्यात काही अडचणी येत असतील, तर त्या दूर करण्यासाठी सरकार प्रयत्न करील, असं त्यांनी सांगितलं

या वेळी रत्नागिरीचे पालकमंत्री आणि राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत उपस्थित होते.

रत्नागिरीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचं लोकनेते श्यामराव पेजे असं नामकरण आणि इमारतीचं लोकार्पणही आज मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते झालं.

<><><><><>

राज्यातल्या रास्त भाव दुकानदारांचं कमिशन वाढवण्याबाबत सरकार सकारात्मक असल्याचं अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आज सांगितलं. भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आज रास्त भाव दुकानदारांची बैठख झाली, यावेळी मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि अन्न आणि नागरी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंह देओल उपस्थित होते.

रास्त भाव दुकानारांना स्टेशनरी आणि भाजीपाला विकायला परवानगी देण्यात आली आहे. याचा फायदा राज्यातल्या ५६ हजार दुकानदारांना झाला आहे, असं भुजबळ यांनी सांगितलं. या दुकानदारांना क्विंटल मागे दीडशे रुपये कमिशन दिलं जातं. हे कमिशन अत्यल्प असल्याने त्यात वाढ करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. तसंच ई पॉस मशीनमध्ये तांत्रिक अडचणी येत असल्याने ऑफलाईन वितरण करायला परवानगी देण्यात आली आहे, असं भुजबळ यांनी सांगितलं.

<><><><><>

राज्य शासनाच्या कृषी विभागानं बीड जिल्ह्यात परळी वैजनाथ इथं आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचं उद्घाटन आज केंद्रीय कृषी मंत्री

शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते झालं. ते या महोत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार, राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे, आमदार पंकजा मुंडे यावेळी उपस्थित होते.

या महोत्सवात कृषी प्रदर्शन, परिसंवाद, चर्चा सत्र, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री, अत्याधुनिक कृषी औजारांचं प्रदर्शन आदी गोष्टींचं आयोजन करण्यात आलं. हा महोत्सव २५ ऑगस्ट पर्यंत चालणार आहे.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेतला कांस्यपदक विजेता नेमबाज स्वप्नील कुसळे याचं जिल्हा प्रशासनाच्या वतीनं आज कोल्हापुरात जल्लोषात स्वागत करण्यात आलं. महाराणी ताराराणी यांच्या पुतळ्यापासून निघालेल्या स्वागत मिरवणुकीत नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. शालेय विद्यार्थी, खेळाडू देखील सहभागी झाले होते. जिल्हा प्रशासनानं चांदीची गदा, सन्मानचिन्ह आणि मानपत्र देऊन त्याचा भव्य सत्कार केला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या पोलंड दौऱ्यासाठी राजधानी वारसॉ इथं दाखल झाले. वारसॉ इथल्या लष्कराच्या विमानतळावर प्रधानमंत्री मोदी यांचं उत्साहात स्वागत करण्यात आलं. पोलंड आणि भारतातल्या जामनगर आणि कोल्हापूर यांच्यातले ऋणानुबंध जपणाऱ्या दोन स्मृति स्थळांना प्रधामंत्री भेट देणार आहेत. त्यानंतर वारसॉ इथंल्या कार्यक्रमात प्रधानमंत्री सहभागी होतील आणि भारतीय वंशांच्या नागरिकांशी ही ते संवाद साधणार आहेत.

पोलंड आणि भारताच्या राजनैतिक संबंधांना ७० वर्षे पूर्ण होत हा दौरा महत्त्वाचा असल्याचं प्रधानमंत्र्यांनी पोलंडला रवाना होण्यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या

निवेदनात म्हटलं होतं. या दौऱ्यात प्रधानमंत्री पोलंडचे प्रधानमंत्री डोनाल्ड टस्क आणि राष्ट्रपती आंद्रेज डूडा यांची भेट घेऊन ते चर्चा करणार आहेत. ४५ वर्षांनंतर भारताचे प्रधानमंत्री प्रथमच पोलंडला भेटीवर गेले आहेत.

युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्या निमंत्रणावरून प्रधानमंत्री मोदी येत्या शुक्रवारी २३ तारखेला युक्रेनला जाणार असून, १९९२ नंतर प्रथमच भारतीय प्रधानमंत्री युक्रेनला भेट देणार आहेत. युक्रेनचे प्रधानमंत्री वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्या बरोबर ते अनेक द्विपक्षीय मुद्दयांवर चर्चा करणार असून तिथल्या भारतीयांशी आणि विद्यार्थ्यांशीही संवाद साधणार आहे. रशिया युक्रेन दरम्यानच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांचा हा दौरा भारतच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

**<><><><>**

ज्येष्ठ साहित्यिक महादेव मोरे यांच्या निधनामुळे मराठी भाषेचं ऐश्वर्य वाढवणारा साहित्यिक आपण गमावला आहे, अशी भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. निपाणीसारख्या परिसरात राहून मोरे यांनी मराठी भाषेची श्रीमंती जगभर पोहोचवली. सीमाभागातल्या मराठीचा लहेजा, शैली आणि मराठी संस्कृतीचं महत्वाचं चित्रण त्यांच्या लिखाणात येतं, मराठी भाषकांसाठी मोरे यांचं लिखाण नंदादीपासारखं तेवत राहील, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><>**

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता असून राज्यात सर्वत्र तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.